**पाहिजेत**
दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत.
संपर्क - ९६२३४८४४८४

दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३१६ ■ गुरूवार, दि. १३ मार्च २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -316 ■ Thursday, 13 March 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

### 'एमपीएससी' पदभरती आणि पेपरफुटी, कॉपी, गुणांच्या पारदर्शकतेवर विधानपरिषदेत चर्चा

# अधिकारी कर्मचाऱ्यांमध्ये अतिरिक्त १५० ते २०० पदे वाढवून द्या

## लोकसेवा आयोग कर्मचारी संघटनेची मागणी

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

**महाराष्ट्र विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) संदर्भातील विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. विधानपरिषदेचे सदस्य सतेज ऊर्फ बंटी पाटील, अभिजित वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, जयंत आसगावकर, राजेश राठोड, धीरज लिंगाडे, डॉ. प्रज्ञा सातव, मिलिंद नार्वेकर आणि सुनिल शिंदे यांनी एमपीएससी संदर्भात प्रश्न उपस्थित केला. यावेळी एमपीएससीमार्फत होणारी पदभरती आणि पारदर्शकता व पेपरफुटीवर प्रश्न विचारण्यात आला. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले.**



राज्य शासनाच्या ४२ विभागांमध्ये सद्यःस्थितीत अडीच लाखाहून अधिक पदे रिक्त असून शासनाने दरवर्षी ५० हजार पदांची मेगा भरती करण्याकरीता काही जाहिराती प्रसिध्द केल्या असल्या तरी सदर भरती प्रक्रिया राबवण्यासाठी लोकसेवा आयोगाकडे मनुष्यबळ नसल्याने लोकसेवा आयोगाला उपरोक्त रिक्त पदे भरण्यासाठी व भरती प्रक्रिया सुलभ होण्यासाठी आहे. त्या अधिकारी कर्मचाऱ्यांमध्ये अतिरिक्त १५० ते २०० पदे वाढवून देण्याची मागणी लोकसेवा आयोग कर्मचारी संघटनेने राज्य शासनाकडे केली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय? असा प्रश्न उपस्थित करण्यात आला.

यासोबतच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मनुष्यबळ नसल्यामुळे खाजगी कंपनीकडून परीक्षांचे नियोजन केले जात असल्याने त्यामध्ये अपारदर्शकता, पेपरफुटी, कॉपी, मार्कामध्ये तफावत असे अनेक गैरप्रकार वारंवार निदर्शनास येत आहेत, हे ही खरे आहे काय अशीही विचारणा करण्यात आली. मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले आहे. लोकसेवा आयोग कर्मचारी संघटनेची पदभरतीची मागणी आली आहे. परंतु, अपारदर्शकता, पेपरफुटी, कॉपी, मार्कामध्ये तफावत हे प्रकार आणि खासगी कंपनीकडून परीक्षांचे नियोजन करणे हे खरे नाही असे मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या उत्तरात सांगितले आहे.

**रिक्त पदे आणि कर्मचारी वाढीचा मुद्दा**

सध्या राज्य शासनाच्या ४२ विभागांमध्ये सुमारे अडीच लाख पदे रिक्त आहेत. शासनाने दरवर्षी ५० हजार पदे भरण्याची मेगा भरती योजना जाहीर केली असली तरी, भरती प्रक्रिया राबवण्यासाठी लोकसेवा आयोगाकडे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नाही. त्यामुळे एमपीएससी कर्मचारी संघटनेने १५० ते २०० अतिरिक्त पदे निर्माण करण्याची मागणी केली आहे. ही मागणी जानेवारी २०२५ मध्ये सम ोर आली असल्याचे अधिवेशनात मांडण्यात आले.

**पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह**

भरती प्रक्रियेत पारदर्शकता राखली जात नसल्याचे आरोपही झाले. परीक्षांचे नियोजन खासगी कंपनीकडून केल्यामुळे पेपर फुटी, कॉपी आणि गुणांमध्ये तफावत असे प्रकार वारंवार घडत असल्याचे सांगण्यात आले.

यावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, लोकसेवा आयोग कर्मचारी संघटनेने पदभरतीसाठी अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करण्याची मागणी केली आहे, मात्र अपारदर्शकता, पेपरफुटी किंवा गुणांमध्ये तफावत होण्याचे आरोप निराधार आहेत.

**तलाठी आणि जिल्हा परिषदेच्या भरतीवर स्पष्टीकरण**

तलाठी आणि जिल्हा परिषदेच्या पदभरती प्रक्रियेवरही प्रश्न विचारण्यात आले. पात्र उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्यात येत नसल्याचेही विचारण्यात आले. यावर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, तलाठी आणि जिल्हा परिषदेची भरती प्रक्रिया ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होत नाही.

तसेच नियुक्ती पत्र देण्याची जबाबदारीही आयोगाची नाही.ङ्ग त्यामुळे या प्रक्रियेचा एमपीएससीच्या मनुष्यबळाशी कोणताही संबंध नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## आर्टिफिशल व फेक पनीर विक्री विरोधात कडक कारवाई करणार - उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई : फेक पनीर किंवा आर्टिफिशियल पनीर हे निश्चितच नागरिकांच्या आरोग्यासाठी धोक्याचे आहे. हे पनीर विक्री करीत असलेल्या विक्रेते व संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल. अनॉलॉग चीज च्या नावाखाली आर्टिफिशल पनीर किंवा फेक पनीर विक्रीबाबत संबंधित अधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच या विषयातील तज्ज्ञ व्यक्तींची बैठक घेण्यात येईल. या बैठकीत निर्णय घेऊन फेक पनीर विक्री बाबत कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिला.

नालॉग चीज हा पदार्थ राज्यात नालॉग पनीर (, आर्टिफिशियल पनीर किंवा फेक पनीर या नावाने विक्री केल्या जात असल्याबाबत सदस्य विक्रम पाचपुते यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेत सदस्य कैलास पाटील यांनीही सहभाग घेतला.

उपमुख्यमंत्री पवार या सूचनेच्या उत्तरात माहिती देताना म्हणाले का, खाद्यपदार्थांतील भेसळ ओळखण्यासाठी त्यांचे नमुने घेण्यात येतात. या नमुन्यांची तपासणी करून त्याचे विश्लेषण करण्यात येते. प्रयोगशाळांमधील विश्लेषणामुळे भेसळ आढळलेल्या नमुन्यांवर कारवाई करीत भेसळयुक्त पदार्थ जनतेमध्ये जाण्यापासून रोखता येतात. त्यासाठी अन्न व औषध प्रशासनाच्या नवीन प्रयोगशाळा, प्रयोगशाळांचे बळकटीकरण यासाठी भरीव निधी देण्यात येईल.

फेक पनीरची विक्री, साठवणूक व वाहतुक विरोधात कारवाई करण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या नियम ांमध्ये सुधारणा करून ते अधिक कठोर करण्यात येतील. तसेच केंद्र शासनाच्या नियमांमध्ये बदल करण्यास संबंधित केंद्रीय मंत्र्यांची चर्चा करण्यात येवून विनंती करण्यात येईल. कुठल्याही परिस्थितीत अशा पनीर विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचा स्पष्ट इशाराही उपमुखमंत्री श्री. पवार यांनी दिला.

## मुंबईच्या लिलावती रुग्णालयात काळी जादू




मुंबई : ट्रस्टच्या निधीद्वारे चालवल्या जाणाऱ्या मुंबईच्या लिलावती रुग्णालयात काळी जादू करण्यात आल्याचे वृत्त आहे. सेलिब्रेटींचे रुग्णालय अशीही लिलावती रुग्णालयाची ओळख आहे. राजकारण, क्रीडा, मनोरंजन क्षेत्राशी संबंधित दिग्गज उपचारांसाठी लिलावती रुग्णालयात येतात. यामुळे मुंबईसह देशभर ख्याती असलेल्या या रुग्णालयात जमिनीखाली पुरलेले आठ कलश आढळले आहेत. या कलशांमध्ये म णसांची हाडं आणि केस आहेत. पुरुन ठेवलेल्या या कलशांची स्थिती बघून त्यांचा वापर काळी जादू करण्यासाठी झाला असल्याचे मत बघणाऱ्यांनी व्यक्त केले आहे.

याआधी ट्रस्टच्या निधीचा गैरवापर झाला आणि लिलावती रुग्णालयात १२०० कोटी रुपयांचा घोटाळा करण्यात आल्याचा आरोप झाला. आता रुग्णालयात काळी जादू करण्यात आल्याचा संशय व्यक्त होत आहे. यामुळे रुग्णांना बरे करण्यासाठी प्रसिद्ध असलेले रुग्णालय सध्या वेगळ्याच कारणांमुळे चर्चेत आहे. लिलावती रुग्णालय ट्रस्टचे कार्यकारी संचालक परमबीर सिंग यांनी पत्रकार परिषद घेऊन रुग्णालयात काळी जादू करण्यात आल्याचा संशय व्यक्त केला आहे.

लिलावतीच्या माजी ट्रस्टींनी ट्रस्टच्या निधीचा गैरवापर करुन १२०० कोटी रुपयांचा घोटाळा केला, असा आरोप रुग्णालयाचे संचालक प्रशांत मेहता यांनी केला.

पाठोपाठ लिलावती रुग्णालय ट्रस्टचे कार्यकारी संचालक परमबीर सिंग यांनी रुग्णालयात काळी जादू करण्यात आल्याचा संशय व्यक्त केला आहे. आर्थिक घोटाळा प्रकरणी लिलावती कीर्तिलाल मेहता मेडिकल ट्रस्टने या प्रकरणात वांद्रे पोलिसांसह ईडीकडे तक्रार केली आहे. निधी गैरवापर प्रकरणी तपास करण्याचे निर्देश वांद्रे न्यायालयाने दिले आहेत. पोलीस काळी जादू प्रकरणाचा तपास करत आहेत.

## सरकारचं डोकं ठिकाणावर आहे का?, मराठी सणांचा उल्लेख करत आदित्य ठाकरेंची टीका

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच, प्रार्थनास्थळांवर लाऊडस्पीकरसाठी ठरवून दिलेल्या आवाजाच्या मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला होता. याबाबत बोलताना फडणवीस यांनी केंद्र सरकार आणि न्यायालयांच्या आदेशांचे दाखले देत मार्गदर्शक नियमांचे काटेकोरपणे पालन करावी लागेल असे म्हटले होते.

यानंतर माजी मंत्री आणि शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) आमदार आदित्य ठाकरे यांनी, 'माईक आणि लाऊडस्पिकरचे नियम' दाखवून कोळीवाड्यातल्या उत्सवावर विरजण घालण्याचं काम सुरू असल्याचा आरोप केला आहे. याचबरोबर त्यांनी, ङ्गमहाराष्ट्र सरकारचं डोकं ठिकाणावर आहे का?, असा प्रश्नही उपस्थित केला आहे.

**सरकारचं डोकं ठिकाणावर आहे का?**

आज एक्सवर केलेल्या एका पोस्टमध्ये आदित्य ठाकरे म्हणाले की, महाराष्ट्र सरकारचं डोकं ठिकाणावर आहे का? आधीच आमच्या गणेश मंडळांना विविध नियमांमध्ये अडकवून आणि विसर्जनाचा प्रश्न प्रलंबित ठेवून छळलं जातंय आणि आता कोळीबांधवांसाठीच नाही तर सर्व हिंदू धर्मीयांसाठी महत्वाच्या असलेल्या होळी सणाच्या वेळी 'माईक आणि लाऊडस्पिकरचे नियम' दाखवून माझ्या वरळी मतदारसंघातल्या कोळीवाड्यातल्या उत्सवावर विरजण घालण्याचं काम सुरु आहे.

**मराठी सणांवर बंधनं घालायची:** आपल्या पोस्टमध्ये आदित्य ठाकरे पुढे म्हणाले की, या सरकारला मराठी म ाणसांच्या सणांविषयी इतका आकस का आहे? 'चुनावी हिंदुत्व राबवायचं आणि सत्तेत आल्यावर मात्र मराठी सणांवर बंधनं घालायची', ही कसली निती?

**काय म्हणाले होते देवेंद्र फडणवीस?** - भाजपा आमदार देवयानी फरांदे यांनी दोन दिवसांपूर्वी विधानसभेत मशिदींमधील लाऊडस्पीकरचा मुद्दा उपस्थित केला होता. लाऊडस्पीकरमुळे होणारे ध्वनी प्रदूषण धोकादायक बनले आहे. मशिदींमध्ये लाऊडस्पीकर वाजतात, ज्यामुळे लोकांना त्रास होतो. ते खूप मोठ्या आवाजात असतात, असे त्या म्हणाल्या होत्या. नियमांचे उल्लंघन करून लाऊडस्पीकरचा वापर केला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

## छत्रपती घाबरायला लागले, तर अवघड व्हायचं : शिवेंद्रसिंहराजे

सातारा : 'मी माझ्याच गाडीतून फिरत असतो. मला व्हॅनिटी व्हॅनची गरज नाही. महाराष्ट्रात छत्रपती घाबरायला लागले, तर अवघड व्हायचं,' अशा शब्दांत छत्रपती घराण्याचा अभिमान सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दाखवून दिला. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येत असलेले मुंबई-गोवा महाम ार्गाचे काम जानेवारी २०२६ पूर्वी पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी विधानसभेत दिली. आमदार भास्कर जाधव यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर बोलताना शिवेंद्रसिंहराजे यांनी, मी महाम ार्गाची पाहणी केली असल्याचे सांगितले.

मुंबई-गोवा महामार्गाच्या काम ासंदर्भात गुहागर मतदारसंघाचे आमदार भास्कर जाधव यांनी अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला. त्या प्रश्नाला शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी उत्तर दिले. ते म्हणाले, 'मुंबई-गोवा हायवेचे २०११ पासून काम सुरू आहे. या कामास विलंब झाला आहे. कोकणातील बरेच लोक मुंबईस वास्तव्यास असून त्या ठिकाणी नोकरी-व्यवसाय करत आहेत. त्यांच्या दृष्टीने हा महामार्ग महत्त्वाचा ठरतो. राज्याच्या विकासात या महामार्गाचा मोठा वाटा आहे.

मी स्वतः या महामार्गाची पाहणी केली आहे.' शिवेंद्रसिंहराजे म्हणाले, 'भास्करराव, मला व्हॅनिटी व्हॅनची गरज नाही. माझी स्वतःची गाडी आहे. या गाडीतून फिरण्याची माझ्यात ताकद आहे. मी स्वतः या महामार्गाची पाहणी संबंधित लोकप्रतिनिधींना सोबत घेऊन केली.

## शक्तीपीठ महामार्गामुळे महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शक्तीपीठ महामार्ग हा महाराष्ट्राच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. हा महामार्ग नागपूरपासून सिंधुदुर्गपर्यंत १२ जिल्ह्यांमधून जाणार असून, महाराष्ट्रातील महत्त्वाच्या शक्तीपीठांना जोडणारा आहे. त्यामुळे मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्राच्या औद्योगिक तसेच आर्थिक विकासालाही चालना मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत सांगितले की, जसे समृद्धी महामार्गामुळे १२ जिल्ह्यांचे जीवनमान बदलले, त्याचप्रमाणे शक्तीपीठ महाम ार्गामुळेही मोठे परिवर्तन घडेल. या महाम ार्गामुळे राज्यातील विविध भागांत सुलभ आणि वेगवान वाहतूक व्यवस्था निर्माण होईल, ज्यामुळे व्यापार आणि उद्योगांना गती मिळेल.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी स्वतःहून या महामार्गासाठी जागा देण्याची तयारी दाखवली आहे. कोल्हापूरच्या एअरपोर्टवर एक हजार शेतकऱ्यांचे निवेदन प्राप्त झाले, ज्यात महामार्गाचे समर्थन करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी चर्चा करू, त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करू. पण हा म हामार्ग महाराष्ट्राच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा असून तो होणारच, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

द्धज्या भागांकडे आजवर दुर्लक्ष झाले, त्या भागांचा विकास करण्यासाठी दिल्ली-मुंबई ग्रीनफिल्ड महामार्ग हे योग्य माध्यम आहे.ङ्घअमेरिकेचे अध्यक्ष जॉन एफ केनेडी यांचे प्रसिद्ध उद्गार आहेत - अमेरिका श्रीमंत आहे कारण तेथे चांगले रस्ते आहेत. आपण महाराष्ट्राचाही हा विकास याच पद्धतीने साधणार आहोत,ङ्घ असे त्यांनी नमूद केले.

या महामार्गामुळे शक्तीपीठ आणि औद्योगिक केंद्रे जोडली जातील. मराठवाडा, विदर्भ आणि कोकणातील उद्योगांना चालना मिळेल. राज्यातील वाहतुकीचा वेग आणि सुविधा सुधारतील. पुरवठा साखळी मजबूत होईल आणि रोजगाराच्या संधी निर्माण होतील. शेतकऱ्यांना अधिक चांगल्या रीतीने बाजारपेठेपर्यंत पोहोचता येईल. ङ्गहा केवळ रस्ता नसून महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठीचे महत्त्वाचे पाऊल असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.'

# पर्यावरण पूरक होळी साजरी करावी

देशात होळी हा सण प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या पध्दतीने सर्वत्र साजरा करण्यात येतो. यामुळे आपल्याला सर्वत्र होळी मिलन दिसून येते. महाराष्ट्रात मराठी माणसांसाठी होळीचे आगळीवेगळे महत्त्व आहे. होळी म्हणजे मराठी वर्षाचा शेवटचा सण. ज्याप्रमाणे इंग्रजी वर्षानुसार डिसेंबर हा शेवटचा महिना असतो त्याचप्रमाणे होळीचा फाल्गुन महिना मराठी माणसासाठी शेवटचा महिना आहे. नवीन वर्षांची सुरुवात चैत्र महिन्यापासुन होते म्हणजेच ‘गुडी पाडवा‘. त्यामुळे जुने वर्ष होळी व धुलीवंदनाच्या रूपात साजरे करून जुन्या वर्षाला निरोप दिला जातो आणि गुढीपाडव्याच्या निमित्ताने नवीन वर्षाचे स्वागत मोठ्या उत्साहाने केले जाते. बदलत्या काळानुसार होळी व धुलीवंदन साजरे करतांना पर्यावरण व निसर्गाचे संतुलन जोपासने अत्यंत गरजेचे आहे.त्याच अनुषंगाने कोणत्याही धर्माचे सण असो त्यांनी सुध्दा निसर्गाला कुठेही इजा पोहोचणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. सध्याच्या परिस्थितीत वाढते प्रदूषण व भीषण पाणी टंचाई सर्वांसाठी चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.त्यामुळे होळी हा सण साजरा करतांना पर्यावरणाशी निगडित असावा जेणेकरून निसर्गाला इजा पोहोचणार नाही.कारण होळी या सणाला लाकुड,पाणी यांचा वापर जास्त होतो आणि या दोन्ही गोष्टी पर्यावरणाशी अत्यंत निगडित आहेत. होळीला दरवर्षी पाण्याचा वापर मोठ्या प्रमणात होत असतो. त्यामुळे होळी या सणाला पाण्याचा वापर कमी करावा व पर्यावरणातील वाढते प्रदूषण पहाता स्वच्छतेकडे सर्वांनीच जास्तीत जास्त लक्ष केंद्रित करावे.देशात आणि जगात पिण्याच्या पाण्याची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे आणि वाढणार सुध्दा आहे.त्यामुळे होळीच्या सणाला पाण्याचा वापर टाळावा व पाणी वाचविण्याचा संकल्प सर्वांनीच करावा. ‘उष्णतेचे वादळ आणि पाण्याचा हा!हा!कार’ यामुळे मानव व पशुपक्षी नेहमीच भरडत असतो आणि भरडत आहे.वाढती लोकसंख्या यामुळे मानवाने भुभाग पुर्णतः काबीज केल्याचे दिसून येते.देशात होळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा केल्या जातो.होळीच्या दीवशी गुलाल, रंग,वारीस इत्यादीसह केमिकल युक्त रंगाचा वापर होतांना आपण पहात असतो.यामुळे डोळ्यांना व चेहऱ्याला इजा होऊ शकते यापासून सावध राहण्याची गरज आहे.रंग खेळताना कोणीही हा विचार करत नाही की पाण्याचा व्यत्यय कीती होतो. होळी या सनाला दरवर्षी ‘लाखो लिटर‘ पाणी वाया जात असते आणि पाण्याची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. उन्हाळ्यात पाण्यासाठी सर्वांनाच वणवण भटकावे लागते.आजही महाराष्ट्रात पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावतांना दीसते व याचा परिणाम शेतकऱ्यांना जास्तीत जास्त भोगावा लागतो.आजच्या परीस्थितीत हवामान खाते सांगत आहे की यावर्षी उन्हाळा नेहमीपेक्षा जास्त तापणार आहे. यावरून आपण समजू शकतो की पाण्याची समस्या कमी न होता मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. त्यामुळे आज पाण्याचा ‘एक एक थेंब‘ वाचवीण्याकरीता मानवाने चुरशीचे प्रयत्न केले पाहिजे.

होळीचा सन हा पाच दिवस म्हणजेच पंचमी पर्यंत चालतो. त्यामुळे या काळात पाण्याचा वापर जास्तीत जास्त टाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याचप्रमाणे देशात अवैधरित्या जंगल तोडीमुळे लाकडांची कमतरता पहाता होळी दहणाकरीता कमीत कमी लाकडांचा उपयोग केला पाहिजे किंवा होळी दहनाकरीता गोअरीचा (काउडंग)चा वापर जास्त करावा यामुळे पर्यावरणात सुगंध निर्माण होईल.देशात आणि जगात पाण्याची समस्या पहाता फक्त देशी गुलाल किंवा फुलांचा वापर करून होळी या महत्त्वपूर्ण सनाचा आनंद घ्यावा.आज पाण्याच्या भरोशावरच मनुष्य,पशुपक्षी,अन्न-धान्य, संपूर्ण जीवसृष्टी,जंगल हे सर्व पाण्यावरच अवलंबून असते.पाणी हे ‘सोन‘समजा आणि होळीला फक्त ‘गुलाल‘ किंवा फुलांचा वापर करून होळीचा सण साजरा करावा. ज्या प्रमाणे मानवाला ‘अन्न,वस्त्र, निवारा‘ या गोष्टीची गरज आहे त्याचप्रमाणे आज संपूर्ण जिवसृष्टीला व पृथ्वीला ‘पाण्याची‘ नितांत गरज आहे.जंगल तोडीमुळे निसर्गाचे संतुलन ‘विस्कळीत‘ झाले आहे.त्यामुळे आज हिंसक पशु (वाघ, बिबट्या,अस्वल) इत्यादी अनेक प्राणी जंगलातून गावात व शहरात शीरकाव करतांना दिसते.कारण मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी जंगल संपदेवर अतीक्रमन केल्याचे दिसून येते.त्यामुळे जंगलातील प्राणी शहरात येत नसुन आपण जंगलाकडे आगेकूच(अतिक्रमण) करीत आहोत. त्यामुळे होळी करीता कमीत कमी लाकडांचा वापर केला पाहिजे.त्याचप्रमाणे होळीच्या निमित्ताने अवैध वृक्षतोड होण्याची शक्यता असते ती ताबडतोब थांबवली पाहिजे.

आता वाढत्या कारखान्यांमुळे आणि परमाणु परीक्षण, शस्त्रस्पर्धा आणि युद्धजन्य परिस्थिती यामुळे प्रदुषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.त्यामुळे होळीला पाण्याचा अपव्यय टाळला पाहिजे.भारतासह संपूर्ण जगभर २२ मार्चला ‘जागतीक जल दीन‘पाळला जातो याची कृती होळीच्या सणाला करावी व पाणी वाचवावे.कारण पाणी हे निसर्गाचे ‘अनमोल रत्न‘आहे.त्याला वाचवीण्याचा प्रयत्न सर्वांनीच सर्व स्तरातून केला पाहिजे.इतर देशांप्रमाणे भारतसुध्दा पाण्याच्या बाबतीत ‘रेडलाईट झोनमध्ये‘ आहे. त्यामुळे भारतसुध्दा पाणी टंचाईच्या केंद्रस्थानी असल्याचे दिसून येते.त्यामुळे होळीचे औचित्य साधून प्रत्येकांनी आपल्या परीसरात एक-एक झाड लावुन निसर्गाला पुनरूज्जीवीत केले पाहिजे व सर्वांनीच पाणी वाचविण्याचा संकल्प केला पाहिजे. यातच खऱ्या अर्थाने धुलीवंदन दीसुन येईल.त्यामुळे ‘जान है तो जहान है‘ हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारून पुढचे पाऊल टाकायला पाहिजे. करोना महामारीने मानवजातीला बरेच काही शिकवीले. त्याचे अनुकरण करून प्रत्येकांनी स्वतःच्या प्रकृतीची काळजी स्वतःच घेतली पाहिजे. होळी उत्सवात उन्माद नको! हुल्लडबाजी नको परंतु आनंद भरपूर घ्यावा. यामुळे सर्वांचेच जीवन सुरक्षित रहाण्यास मोठी मदत मिळेल. कारण आपण सुरक्षित तर निसर्ग सुरक्षित, निसर्ग सुरक्षित तर संपूर्ण जीवसृष्टी सुरक्षित, संपूर्ण जीव सृष्टी सुरक्षित तर जग सुरक्षित.यासाठी होळीच्या महत्वपूर्ण सणाचे औचित्य साधून प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावलेच पाहिजे. यामुळे एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड होईल व पर्यावरण सुधारण्यास मोठी मदत होईल आणि होळी या सणाचे महत्त्व संपूर्ण जगात निसर्ग वाचविण्याच्या दृष्टीकोनातून चांगला संदेश जगभर पसरेल.

**- रमेश कृष्णराव लांजेवार**
(माजि विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९,नागपूर.

# प्रेमाच्या इशाऱ्यावर सृष्टीचक्र!

**(निस्वार्थ प्रेमभावना विशेष.)**

आजच्या काळात जास्तकरून प्रेम शब्दाला स्त्री व पुरुष यांच्या प्रेम प्रसंग- प्रणय यांच्याशी जोडून पाहिले जाते. परंतु प्रेम हे जगातील कोणत्याही वस्तुशी अथवा व्यक्तीशी होऊ शकते. प्रेमाच्या प्रभावानेच सृष्टीतील लोक एक दुसऱ्याची मदत करतात, एक दुर्सयाच्या जीवनात सहयोग करता. याशिवायही प्रेमाचे अनेक रूप आहेत. जसे पतीपत्नीचे प्रेम, भाऊ बहिणीचे प्रेम, मित्रांचे आपापसातील प्रेम, प्रियकर आणि प्रेयसीचे प्रेम, गुरु आणि शिष्यचे प्रेम इत्यादी इत्यादी. प्रेमाशिवाय मनुष्य जीवन संभव नाही. म्हणूनच प्रेम हेच जीवन आहे, असे म्हटले जाते. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे खरे प्रेम हे नेहमी निस्वार्थ असते, स्वार्थी तर लोक असतात जे त्याला विकृत स्वरूप देतात. अशी उद्बोधक माहिती श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजींच्या सदर लेखात जरूर वाचा... संपादक

**‘खरा तो एकचि धर्म!**
**जगाला प्रेम अर्पावे!धृ.!**
**जगी जे हीन अतिपतित!**
**जगी जे दीन पददलित!!**
**तया जाऊन उठवावे!**
**जगाला प्रेम अर्पावे!!‘**

पूज्य साने गुरुजींनी तर मानवधर्मच प्रेमावर अवलंबून असल्याचे सांगितले आहे. प्रेम काय आहे? खऱ्या प्रेमाचे वर्णन करणे खुप कठीण आहे. खरे प्रेम त्या सागरासारखे आहे ज्याची खोली न मोजता येण्यासारखी आहे. खरे प्रेम ती भावना आहे जी एखादी वस्तू, व्यक्ती, स्थान, जीव अथवा ईश्वराविषयी तयार होते. प्रेमाचा सरळ संबंध भावनेशी आहे. प्रेमाचा हा सिद्धांत प्राणी आणि धार्मिक विश्वासांवरही लागू होतो. उदाहरण म्हणून एखादी व्यक्ती तिच्या कुत्र्याशी खुप प्रेम करते, स्वातंत्र्य सैनिकाला स्वातंत्र्याशी प्रेम आहे किंवा एखाद्या व्यक्तीला परमेश्वराशी प्रेम आहे. अशा पद्धतीने प्रेमाची विविध रूपे असतात. प्रेमाला विशिष्ट मर्यादेत बांधता येत नाही. प्रेम स्वछंद उडणाऱ्या पक्ष्याप्रमाणे स्वतंत्र असते. खरे पांडित्य अडिच अक्षराच्या प्रेमाभ्यासाने येते, असे संतशिरोमणी कबीरजी महाराज म्हणतात-

**‘पोथी पढ़ पढ़ जग मुवों**
**पण्डित भया न कोयें**
**ढाई अक्षर प्रेम कों**
**पढे सो पण्डित होयें‘**


प्रेमाचा खरा अर्थ निस्वार्थ भावनेने समोरच्याला सर्वस्व अर्पण करणे हाच आहे. आपल्या प्रेमीच्या हित आणि आनंदासाठी स्वतःच्या आनंदाचा त्याग करणे, खरे प्रेम आहे. प्रेम जीवन देते जीवन घेत नाही. प्रेम परमेश्वराने दिलेली समतुल्य, पवित्र आणि महान वस्तू आहे. मनुष्य या पवित्र प्रेमाला त्याच्या स्तरावरून खाली ओढत आहे. मनुष्याने प्रेमाला इच्छा आणि वासना पर्यंत मर्यादित केले आहे. म्हणून आज हे स्वार्थीप्रेम हे हत्या आणि आत्महत्यांचे सर्वात मोठे कारण बनले आहे. प्रेम देणारा समर्पण भावनेने वागतो, मात्र प्रेम घेणारा आपले नाते- संबंध काय? हे विचारात न घेताच त्याचा गैरफायदा उठवतो. गुरू-शिष्य हे नाते मातृप्रेमाचे असते, मात्र संधीसाधू, भोंदूगुरू हा शिष्याच्या जवळकितेच्याच सुवर्ण संधीप्रमाणे वाट बघत असतो. संधी हाती येताच तो हलकट-लंपट दुष्कृत्य, अत्याचार, अनाचार, भ्रष्टाचार वा बलात्कार करून पवित्र नाते कलंकित करतो. गुरूबंधू- गुरूसिख यांचे परस्परातील नाते हे बहिणभावाचे असावयास हवे, मात्र तेही असेच वासनांध भावनेतून स्वतःच्या उजळ रुपाला काळिमा फासून घेतात. अशा आपल्या दुर्व्यवहारी- व्याभिचारी वृत्तीने समाजाचे ‘शी-थूऽऽऽ..!‘ तोंडावर पाडून घेतात आणि आजिवन तुरुंगात सडतात. यामुळेच भक्तीमार्ग संशयाच्या भोवऱ्यात अडकला आहे. अशांना ज्ञानी- गुणी कोण म्हणेल? ईश्वर हे प्रेमाचेच नाव आहे, मग या विधानाची सत्यता गोत्यात तर येणारच ना!

‘अनेकचित्त विभ्रांता मोहजाल समावृत्ताः।
प्रसक्ताः कामभोगेषु पतन्ति नरकेऽ
शुचौ।।१६।।‘
(पवित्र श्रीमदब भगवद्गीता: अध्याय- १६: दैवासुर संपद्विभाग योग)

अर्थ: नाना प्रकारच्या कल्पनांनी भ्रमित, मोहाच्या जाळ्यांत पूर्णपणे गुरफटलेले आणि विषयभोगांत लंपट झालेले हे आसुरी स्वभावाचे लोक अखेरीस अमंगळ नरकांत रूततात.

जर तुम्ही कोणाशी खरे प्रेम करीत असाल, परंतु या गोष्टीपासून चिंतीत असाल की तुमचा प्रेमी देखील तुम्हाला असेच निस्वार्थ प्रेम करतो की नाही. तर चला आता आपण जाणून घेऊया की खरा प्रेमी अथवा प्रेमिकाचे गुण कोणते आहेत- सन्मान करणे: मान सन्मान कोणत्याही व्यक्तीचे आभूषण असते. जर तुमचा प्रेमी तुमचा खुप सन्मान करीत असेल व तुमच्या सोबतच इतरांशी देखील सन्मानाने वागत असेल तर तो व्यक्ती निश्चल मनाचा आहे. आजकाल अनेक प्रेमी- प्रेमिका आहेत, काही वरवर तर काही एक दुसऱ्यावर निस्सीम प्रेम करतात. परंतु लहान मोठ्या गोष्टीवर शिव्या देणे आणि चारित्र्यावर संशय घेणे असा त्यांचा व्यवहार असतो. जर एखादी व्यक्ती असे करीत असेल तर ती कपटी मनाची व स्वार्थी व्यक्ती आहे. स्वतः पेक्षा जास्त तुमच्यावर विश्वास ठेवणे: खरे प्रेमी स्वतःपेक्षा जास्त एकमेकांवर विश्वास ठेवतात. विश्वास ठेवल्याने एकमेकांमधील नाते आणखी मजबूत होते. जर तुमचा प्रेमी- प्रेमिका तुमच्यावर विश्वास ठेवत नसेल आणि तुमच्या लहान मोठ्या गोष्टीवर संशय करीत असेल, तर अशा व्यक्तीपासून दूर राहिलेलेच चांगले. काळजी घेणे: खरे प्रेमी- प्रेमिका एकमेकांची नेहमी काळजी घेतात. त्यांना स्वतःपेक्षा जास्त आपल्या प्रेमीची चिंता असते. जर प्रेमी- प्रेमिका वाईट परिस्थितीतून जात असेल, तर अशावेळी एक खरा प्रेमी नेहमी विश्वास आणि काळजी घेतो. एका आईप्रमाणे निस्वार्थ भावनेने आपल्या प्रेमीची काळजी करतो. नेहमी खरे बोलणे: खरा प्रेमी तुमच्याशी नेहमी खरे बोलेल. त्याचा काही भूतकाळ असेल, तर त्याबद्दलची माहिती तो तुम्हाला आधीच देईल. जर तुम्ही देखील कोणावर प्रेम करीत असाल परंतु त्याला आपला भूतकाळ सांगितला नसेल, तर न घाबरता सर्वकाही सांगून टाकावे. कारण खरे प्रेम हे शरीरावर होत नसून हृदयावर केले जाते. खरे प्रेम तुमच्या सर्व चुकांना माफ करायला तयार असते. प्रेमात नमुन जाणे: चूक कोणाचीही असो, परंतु एक खरा प्रेमी- प्रेमिका नाते वाचवण्यासाठी नेहमी माघार घेतो आणि ‘सॉरी- क्षमस्व‘ बोलतो. एका खऱ्या पार्टनरचे कर्तव्य आहे, की आपापसातील नाते खराब होऊ नये म्हणून कठीण परिस्थितीत माघार घेऊन नमुन जाणे. स्वातंत्र्य देणे: खऱ्या प्रेमात तुम्हाला संपूर्ण स्वातंत्र्य असते. खरे प्रेम एका स्वतंत्र्य पक्ष्याप्रमाणे असते, जो कुठेही उडू शकतो. कधीही निर्बंध लावून खरे प्रेम मिळवले जाऊ शकत नाही. खऱ्या प्रेमात प्रत्येकाला आपले विचार आणि धर्म-कर्म अशा प्रत्येक गोष्टीत स्वातंत्र्य असते. शेजाऱ्या पाजाऱ्यांवर प्रेम करण्यास सांगितले जाते, मग काय त्यांच्याशीही असलेच लंपट उपद्व्याप करा, असाच अर्थ घ्यावा काय?

‘गॉड इज लव्ह; लव्ह इज गॉड!
सो लव्ह टु ऑल; लव्ह दाय नेबर्स!‘
(पवित्र बायबल)



- संकलन व शब्दांकन -
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

कोणत्याही प्राणी, वस्तू, सजीव, निर्जीव इत्यादीबद्धल मनामध्ये आपुलकी, स्नेह, जिव्हाळा, आदर, निर्माण होणे आणि ती गोष्ट सहवासात, जीवनात हवीशी वाटणे म्हणजे प्रेम होय. आपले दैनंदिन जीवन जगत असताना सहवासात येणाऱ्या कोणत्याही गोष्टीशी भावनिक, मानसिक, शारीरिक, संबंध जोडले गेल्यामुळे निर्माण झालेला स्नेह म्हणजे प्रेम होय. मानवाच्या वयोगट व नातेसंबंधांनुसार प्रेमाचे स्वरूप असे असते- १) स्नेह- प्रेमाचा हा प्रकार आपण आपल्याहून वयाने लहान असणाऱ्या व्यक्तीसोबत ठेवतो. यात एक काळजी किंवा माया असते. भूतदया किंवा पशुपक्षांबद्दल वाटणारी आपुलकी हीसुद्धा यात मोडते. २) प्रेम- हा समान वयोगटातील व्यक्तींच्या दरम्यान असणाऱ्या संबंधांना दर्शविते. याचे उपप्रकार म्हणजे भगिनीप्रेम, बंधुप्रेम, मित्रप्रेम इत्यादी. ३) आदर- हा प्रेमाचा प्रकार आपल्याहून वयाने मोठ्या अथवा ज्येष्ठ व्यक्तींकरता असतो. यातही संबंधित व्यक्तीची वाटणारी काळजी- विशेषतः त्यांच्या आवडी-निवडी व विचारांची ठेवतात. ही वागणूक त्यांच्या जीवनाच्या अनुभवाची आणि त्यांनी आपल्या केलेल्या संगोपनाबद्दलची एक पावती आणि क्वचित प्रसंगी त्यांना आवडणाऱ्या शिस्तबद्ध दिनचर्येची दखल असू शकते, उदा. बहिणभावाचे प्रेम, पितृप्रेम. पण हे सर्व प्रेमच! ४) ममता- हा तो प्रेमप्रकार की ज्याला अनुभवायला असे म्हणतात की देवही अवतार घेतात. गुरुला या मातृ प्रेमामुळेच ‘गुरूमाऊली‘ संबोधन चिकटले. स्त्रीला मातृत्व प्राप्त झाले की आपल्या बाळासाठी वाटणारे प्रेम म्हणजे ममता होय. ५) भक्ती- प्रेमाचे परमोच्च रूप की ज्याचे वर्णन केवळ अशक्य. परमेश्वर आणि साधक जेंव्हा एकरूप होतात तेंव्हा जो प्रेमप्रकार घडतो, तो म्हणजे भक्ती होय. त्यालाच प्रेमाभक्ती असेसुद्धा संबोधले जाते.

हीच प्रेमाभक्ती म्हणजेच भक्त व भगवंताची एकरूपता होय. भिन्नता म्हणजे विभक्ती- परमेश्वर आणि भक्त दोघेही एकरूप होऊन आपापले वेगळे अस्तित्व घालवून परमोच्च एकरूपता अनुभवतात त्यासच भक्ती असे संबोधन आहे. ६) एकरुपता- प्रेम म्हणजे दोन जीव, नाते, संबंधी, एकत्र येऊन विचाराची देवाणघेवाण करतात, त्याच्या विचारातील एकता म्हणजे प्रेम होय. उदा. पतीपत्नी प्रेम. स्वार्थ- संधीसाधू व्यक्ती मात्र या पवित्र प्रेम स्वरुपांनाही एकाच पारड्यात तोलतो, प्रेमाला बदनाम करतो आणि सगळा घोटाळा होऊन बसतो. म्हणूनच मानवसमाज अशांची धिंड काढतो.

**‘प्रेम का जिसने मर्म न जाना**
**वो बन्दा नादान है।**
**ईश्वर ही तो प्रेम है**
**साधो प्रेम स्वयं भगवान है।**
**मतलब पर जो टिका है**
**उसको प्रेम समझना भूल है।**
**प्रेम अगर निष्काम बने**
**तो एक महकता फूल है।‘**
**(पवित्र सम्पूर्ण हरदेव बाणी: पद क्र.१९८)**

आजच्या काळात जास्तकरून प्रेम शब्दाला स्त्री व पुरुष यांच्या प्रेम प्रसंग- प्रणय यांच्याशी जोडून पाहिले जाते. परंतु प्रेम हे जगातील कोणत्याही वस्तुशी अथवा व्यक्तीशी होऊ शकते. प्रेमाच्या प्रभावानेच सृष्टीतील लोक एक दुसऱ्याची मदत करतात, एक दुर्सयाच्या जीवनात सहयोग करता. याशिवायही प्रेमाचे अनेक रूप आहेत. जसे पती पत्नीचे प्रेम, भाऊ बहिणीचे प्रेम, मित्रांचे आपापसातील प्रेम, प्रियकर आणि प्रेयसीचे प्रेम, गुरु आणि शिष्याचे प्रेम इत्यादी इत्यादी. प्रेमाशिवाय मनुष्यजीवन संभव नाही. म्हणूनच प्रेम हेच जीवन आहे, असे म्हटले जाते. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे खरे प्रेम हे नेहमी निस्वार्थ असते.

स्वार्थी तर लोक असतात जे त्याला विकृत स्वरूप देतात. आता आपण प्रेमाचे दुसरे रूप म्हणजेच विकृत, वासनांध, प्रणयासक्त प्रेम होय. हे प्रेम मनुष्याचा स्वार्थ आणि अज्ञानामुळे निर्माण होते. या प्रेमाचे दुसरे नाव वासना असते. वासना हीच प्रेमाचे विकृत स्वरूप आहे. खोट्या प्रेमात इच्छा, क्रोध, दुःख आणि निराशा उत्पन्न होते आणि याच भावनांचे दुष्प्रभाव म्हणून अपराध आणि अधर्म यांचा जन्म होतो. हे प्रेम मनुष्याला आपल्या पतनाकडे घेऊन जाते. आज समाजात जे मानवी भावनांमध्ये असंतुलन तयार होत आहे, त्यामागील मुख्य कारण निस्वार्थ प्रेमाची कमतरता- अभाव होय. सामाजिक नात्यांची गोष्ट तर दूरच राहिली, परंतु आजकाल आई-मुलगा, पिता-पुत्री, भाऊ-बहीण, यांचे पवित्र प्रेम- माया, वात्सल्य, सहानुभूती आणि पती-पत्नी यांच्या समर्पण व निस्वार्थ प्रेमातही कमतरता निर्माण झाली आहे.

अनेकानेक कारणांमुळे आजकाल प्रत्येक ठिकाणी प्रेमाविषयी तक्रारी ऐकायला येतात. काही लोकांना ईश्वरभक्ती तर काहींना प्रेम या शब्दांचा मोठाच तिरस्कार वाटू लागला आहे. काहींना प्रेम म्हटले की त्याच्या डोळोंडोळी विषयवासनाच दिसते. कारण त्यांना प्रेमाचा खरा अर्थ कधी समजलाच नाही; असे गृहीत धरणेच योग्य!

# महाकुंभ म्हणजे समरसतेचा परिचय!

प्रयागराजमध्ये गेल्या महिन्यात त्रिवेणी संगमामध्ये ४५ दिवसांच्या महाकुंभात सुमारे ६५ कोटी भाविकांनी आस्थेची डुबकी मारली आणि ही सर्व भाविक मंडळी फार भाग्यशाली ठरली आहे. पौष पोर्णिमा ते महाशिवरात्री असा ४५ दिवसपर्यंत चाललेला महाकुंभ १४४ वर्षांनंतर होत असल्याने याचे फार मोठे अनन्य महत्त्व होते आणि या शताब्दीमधील आतापर्यंतची ही सर्वात महत्त्वपूर्ण अविस्मरणीय आणि अकल्पनीय अशी घटना मानली जाईल. त्रिवेणी संगमाच्या काठावर जमलेला अथांग विशाल जनसागर पाहताच मन एकदम भरून येत असे आणि सहजपणे मनात प्रश्न निर्माण होतो की हे काय सुरू आहे? खरोखरच विराट भाविकांचा हा जनसागर म्हणजे जणू भारत देशाला सामाजिक समरसता आणि सांस्कृतिक एकताच्या युग परिवर्तनाचा संकेत मिळाला आहे तसेच महाकुंभच्या माध्यमातून आमची प्राचीन सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरा अधिक सुदृढ व समृद्ध झाली आहे तर दुसरीकडे देशाची विशेषतः उत्तर प्रदेशची अर्थव्यववस्था आणि विकास दर चांगला वेगाने मजबूत होणार आणि लोकांचे जीवनमान चांगल्याप्रकारे सुधारेल असा विश्वास प्रमुख अर्थवेत्त्यांनी व्यक्त केला आहे. यादृष्टीने देखील महाकुंभाचे महत्त्व अनन्यसाधारण वाढले आहे. न भूतो न भविष्यती असे वर्णन महाकुंभाचे करता येईल इतके विराट, विशाल असे स्वरुप होते.

महाकुंभ हे काही धार्मिक आयोजन नव्हते तर यामुळे सामाजिक समरसता, सांस्कृतिक और आध्यात्मिक एकता प्रतिष्ठापित झाली आहे तसेच आज समाजामध्ये जातीपातीमध्ये भेदभाव, तणाव, परस्पर विरोध, भांडण, आणि संभ्रम पसरविण्याचा सुनियोजित असा प्रचार प्रसार विरोधी पक्षांकडून सारखा केला जात आहे, त्यास या महाकुंभामध्ये कोट्यवधी भाविकांनी संगमामध्ये डुबकी मारुन चोख उत्तर दिले आहे आणि विरोधकांच्या प्रचारांकडे दुर्लक्ष केले आहे. संगमामध्ये डुबकी मारताना आपले शेजारी कोण उभा आहे हे कोणास माहीत देखील नव्हते आणि कोणी कुणाला तसे विचारले देखील नाही. आपण कोविड महामारीच्या काळांत संपूर्ण देशभरांत लॉकडाउन असल्याने कोणी कुठे बाहेर जाऊ शकत नव्हता, माणसा माणसामधील संबंध दुरावले होते; परंतु या महाकुंभाचे वेळी प्रयागराजमध्ये त्रिवेणी संगमामध्ये आस्थेची डुबकी मारतांना दुरावलेली माणसे जोडली गेल्याचे पाहावयास मिळाले आणि अशाप्रकारे सामाजिक समरसतेचा परिचय अनुभवला आणि प्रत्यय आला.

महाकुंभाचे एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल की, यामध्ये सर्व समाजातील अगदी तळागळातील, विभिन्न जाती, धर्म, संप्रदाय, भाषा, विविध चालीरिती मानणारे अथवा नाही मानणारे देखील असे सर्वजण सामिल झाले होते आणि प्रामुख्याने उल्लेखीय असे की, यापूर्वी कधी दक्षिणेकडील तमिलनाडू, केरळ, आंध्र प्रदेश, कर्नाटक शिवाय पूर्वोत्तर राज्य आसाम, मेघालय, मिजोरम, त्रिपुरा आदी राज्यांतील सनातनी भाविक मोठ्या संख्येने कुंभामध्ये डुबकी मारायला आले होते. तसेच औद्यागिक आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्रमुख उद्योगपती आपल्या कुटुंबीयांसमवेत हजेरी लावून गेलेत. सुमारे चार हेक्टर कुंभमेळा क्षेत्र परिसरांत संपन्न झालेल्या या संपूर्ण सोहळ्याचे आयोजन, नियोजनाचे श्रेय देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व आणि मार्गदर्शनामध्ये एकूण सर्व प्रकारची व्यवस्था मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या आपल्या सरकारांतील सर्व सहकारी मंत्री, अधिका□यांना आपल्या सोबत घेऊन चालण्याची विशिष्ट कार्यशैली आणि सामूहिक कर्तव्य भावनेला ही जाते. महाकुंभामध्ये सुमारे पन्नास देशांचे राजदूत व उच्चायुक्तही आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हे कथन अगदी तंतोतंत खरे आणि वस्तुस्थिति दर्शविणारे आहे की, प्रयागराजच्या पवित्र भूमीवर महाकुंभ यशस्वीपणे संपन्न झाला. देशाची जाणीव जागृत होते

पान ३ वर

# होळी (हुताशनी पौर्णिमा) सणामागील शास्त्र

फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी येणारा होळी हा सण देशभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. दुष्ट प्रवृत्ती आणि अमंगल विचार यांचा नाश करून सतब प्रवृत्तीचा मार्ग दाखवणारा उत्सव म्हणजे होळी. वृक्षरूपी समिधा अग्नीत अर्पण करून त्याद्वारे वातावरणाची शुद्धी करणे, हा उदात्त भाव होळी साजरी करण्यामागे आहे. होळी सणाचे महत्त्व, हा सण साजरा करण्याची पद्धत याविषयीची शास्त्रीय माहिती या लेखातून देण्याचा प्रयत्न केला आहे.

होळी सणाची तिथी : देशपरत्वे फाल्गुनी पौर्णिमेपासून पंचमीपर्यंतच्या ५ – ६ दिवसांत कुठे दोन दिवस तर कुठे पाचही दिवस हा उत्सव साजरा केला जातो.

होळी सणाला असलेले समानार्थी शब्द : उत्तर भारतात याला होरी, दोलायात्रा, तर गोवा आणि महाराष्ट्र या राज्यांत शिमगा, होळी, हुताशनी महोत्सव अनब होलिकादहन आणि दक्षिणेत कामदहन अशा संज्ञा आहेत. बंगालमध्ये दौलायात्रा म्हणून होळीचा सण साजरा करतात. याला 'वसंतोत्सव' अथवा 'वसंतागमनोत्सव' म्हणजे वसंत ऋतूच्या आगमनासाठी साजरा करायचा उत्सव हे नावही देता येईल.

**होळी सणाचा इतिहास :** (अ.) यपूर्वी ढुंढा किंवा ढौंढा नामक राक्षसी गावात शिरून लहान मुलांना पीडा द्यायची. ती रोग निर्माण करायची. तिला गावाबाहेर हाकलून देण्याकरिता लोकांनी पुष्कळ प्रयत्न केले; पण ती जाईना. शेवटी लोकांनी बीभत्स शिव्या–शाप देऊन आणि सर्वत्र अग्नी पेटवून तिला भिववले अनब पळवून लावले. त्यामुळे ती गावाबाहेर पळून गेली.' असे भविष्योत्तरपुराणात म्हटले आहे.

आ. एकदा भगवान शंकर तपाचरणात गढले होते. ते समाधी अवस्थेत असतांना मदनाने त्यांच्या अंतःकरणात प्रवेश केला. तेव्हा 'मला कोण चंचल करत आहे', असे म्हणून शंकराने डोळे उघडले आणि मदनाला पहाताक्षणीच जाळून टाकले. दक्षिणेतील लोक कामदेव दहनाप्रीत्यर्थ हा उत्सव साजरा करतात. या दिवशी मदनाची प्रतिकृती करून तिचे दहन करतात. या मदनाला जिंकण्याची क्षमता होळीत आहे; म्हणून होळीचा उत्सव आहे.

इ. फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी झालेल्या पृथ्वीवरील प्रथम महायज्ञाची स्मृती म्हणून प्रत्येक वर्षी फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी सर्व भारतात 'होली' या नावाने यज्ञ होऊ लागले.

होळीचे महत्त्व : (अ.) विकारांची होळी करून जीवनात आनंदाची उधळण करायला शिकवणारा सण : 'होळी' हा विकारांची होळी करण्याचा फाल्गुन मसातील सण आहे. 'विकारांची जळमटे जाळून टाकून नवीन उत्साहाने सत्त्वगुणाकडे जाण्यासाठी आम्ही सिद्ध आहोत', याचे जणू तो प्रतीकच आहे. राहिलेला सूक्ष्म–अहंकार हाही होळीतील अग्नीत नाहीसा होतो. तो शुद्ध



सात्त्विक होतो. त्यानंतर रंगपंचमी आनंदाची उधळण करत येते. नाचत–गात एकत्र येऊन जीवनाचा आनंद लुटायचा. श्रीकृष्ण–राधा यांनी रंगपंचमीद्वारे सांगितले, 'आनंदाची उधळण करा.' असे प.पू. परशराम पांडे महाराज यांनी म्हटले आहे.

आ. होळी आपले दोष, व्यसने आणि वाईट सवयी यांना घालवण्याची सुसंधी आहे.

इ. होळी सद्गुण ग्रहण करण्याची /अंगिकारण्याची संधी आहे.

होळी उत्सव साजरा करण्याची पद्धत : देशभरात सर्वत्र साजरा केला जार्णाया 'होळी' या सणात लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण उत्साहाने सहभागी होतात. होळीची रचना करण्याची तिला सजवण्याची पद्धतीही स्थानपरत्वे पालटत असल्याचे सध्या पाहायला मिळते. सर्वसाधारणपणे 'देवळासमोर किंवा सोयीच्या ठिकाणी पौर्णिमेच्या सायंकाळी होळी पेटवायची असते. बहुधा ग्रामदेवतेसमोर होळी उभी केली जाते. श्री होलिकापूजनाचे स्थान शेणाने सारवून अनब रांगोळी घालून सुशोभित करतात. मधोमध एरंड, माड, पोफळी अथवा ऊस उभा करतात. त्याच्या भोवती गोर्वया आणि सुकी लाकडे रचतात. घरातील कर्त्या पुरुषाने शुचिर्भूत होऊन आणि देशकालाचा उच्चार करून 'सकुटुम्बस्य मम ढुण्ढाराक्षसीप्रीत्यर्थं तत्पीडापरिहारार्थं होलिकापूजनमहं करिष्ये ।' असा संकल्प करावा आणि नंतर पूजा करून नैवेद्य दाखवावा. त्यानंतर 'होलिकायै नमः ।' असे म्हणून होळी पेटवावी. होळी पेटल्यावर होळीला प्रदक्षिणा घालावी आणि पालथ्या हाताने बोंब मारावी. होळी पूर्ण जळल्यानंतर ती दूध अनब तूप शिंपडून शांत करावी. श्री होलिकादेवतेला पुरणपोळीचा नैवेद्य, तसेच नारळ अर्पण करावा. मग जमलेल्या लोकांना त्याचा प्रसाद द्यावा. नारळ, पपनस यांसारखी फळे वाटावीत. सारी रात्र नृत्यगायनात व्यतीत करावी.

**होळीची पूजा अशी करावी:**

प्रदीपानन्तरं च होलिकायै नमः इति मन्त्रेण पूजाद्रव्य–प्रक्षेकात्मकः होमः कार्यः । – स्मृतिकौस्तुभ

अर्थ : अग्नी प्रज्वलित केल्यावर 'होलिकायै नमः' या मंत्राने पूजाद्रव्ये वाहून होम करावा.

निशागमे तु पूज्येयं होलिका सर्वतोमुखैः । – पृथ्वीचंद्रोदय

अर्थ : रात्र झाल्यावर सर्वांनी होलिकेचे (वाळलेली लाकडे आणि गोर्वया रचून पेटवलेल्या अग्नीचे) पूजन करावे.

होलिकेची पूजा करतांना म्हणायचा मंत्र

अस्माभिर्भयसन्त्रस्तैः कृता त्वं होलिके यतः ।

अतस्त्वां पूजयिष्यामो भूते भूतिप्रदा भव – स्मृतिकौस्तुभ

अर्थ : हे होलिके (वाळलेली लाकडे आणि गोर्वया रचून पेटवलेल्या अग्ने), आम्ही भयग्रस्त झालो होतो; म्हणून आम्ही तुझी रचना केली. यामुळे आता आम्ही तुझी पूजा करतो. हे होळीच्या विभूती ! तू आम्हाला वैभव देणारी हो.

होळीच्या दुसऱ्या दिवशी करायच्या धार्मिक कृती

**प्रवृत्ते मधुमासे तु**
**प्रतिपत्सु विभूतये ।**
**कृत्वा चावश्यकार्याणि**
**सन्तर्प्य पितृदेवताः**
**वन्दयेतब होलिकाभूतिं सर्वदुष्टोपशान्तये । –**
**स्मृतिकौस्तुभ**

अर्थ : वसंत ऋतूतील पहिल्या प्रतिपदेला समृद्धी प्राप्त व्हावी, यासाठी सकाळी प्रातर्विधी आटोपून पितरांना तर्पण करावे. त्यानंतर सर्व दुष्ट शक्तींच्या शांतीसाठी होलिकेच्या विभूतीला वंदन करावे.

(काही पंचांगांनुसार फाल्गुन पौर्णिमेच्या दुर्सया दिवशी येर्णाया प्रतिपदेपासून वसंत ऋतूला आरंभ होतो.)

**होळीच्या दिवशीची 'होलिका' ही 'होलिका' राक्षसीण नव्हे !**

भक्त प्रल्हादाला घेऊन आगीत बसलेली 'होलिका' ही राक्षसीण होती. होळीच्या दिवशी म्हटल्या जार्णाया मंत्रांमध्ये जो 'होलिका' असा उल्लेख येतो, तो फाल्गुन पौर्णिमेला उद्देशून आहे; त्या राक्षसिणीला उद्देशून नव्हे. फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी लाकडे रचून होम करतात; म्हणून त्या तिथीला होलिका म्हणतात, असे वरील श्लोकांत आलेच आहे. आयुर्वेदानुसार होळीचे लाभ – थंडीच्या दिवसांत शरिरात साठलेला कफ दोष होळीच्या काळात सूर्याच्या उष्णतेमुळे पातळ होतो आणि त्याच्यामुळे विकार उत्पन्न होतात. होळीच्या औषधी धुरामुळे कफ न्यून होण्यास साहाय्य होते. सूर्याच्या उष्णतेमुळे पित्त काही प्रमाणात वाढते. गाणे, हसणे आदींनी मन प्रसन्न होते आणि पित्त शांत होते. होळीच्या वेळी म्हटलेल्या रक्षोघ्न मंत्रांनी वाईट शक्तींचा त्रासही न्यून होतो.' असे वैद्य मेघराज माधव पराडकर,गोवा यांनी म्हटले आहे.

होळीतील 'बोंब मारणे' या कृतीमागील शास्त्र – हिंदूंचा एक पवित्र सण असलेल्या होळीच्या दिवशी होळी पेटवल्यानंतर बोंब मारण्याची प्रथा सर्वत्र पहायला मिळते. ही विकृती नसून त्यामागेही शास्त्र दडलेले आहे; मात्र काही ठिकाणी याचा अतिरेक केला जाऊन परस्परांतील वैर चव्हाट्यावर आणण्यासाठीही बोंब मारली जाते. 'होळीच्या दिवशी अश्लील शब्द उच्चारणे, शिवीगाळ करणे आदी कृती परंपरा म्हणून केल्या जातात. याला धर्मशास्त्रात आधार नाही. मुळात संस्कृत भाषेत एकही शिवी नाही. असे असतांना 'शिवीगाळ करणे' हा हिंदूंच्या सणाचा भाग कसा होऊ शकेल ? होळीच्या दिवशी बोंब मारतांना शिवीगाळ करणे धर्मशास्त्राच्या दृष्टीने चुकीचे आहे. दुष्ट प्रवृत्ती शांत होण्याकरिता हा विधी आहे. फाल्गुन शुद्ध पौर्णिमेला पूर्वा फाल्गुनी नक्षत्र येते. त्या नक्षत्राची देवता 'भग' ही आहे. तेव्हा भगाच्या नावाने बोंब ठोकायची, ही एकप्रकारची पूजाच होय. तो त्या देवतेचा सन्मानच समजावा.

होलिकोत्सवातील गैरप्रकार रोखणे, हे आपले धर्मकर्तव्य आहे ! – सांप्रत होळीच्या निमित्ताने गैरप्रकार होतात, उदा. वाटमारी होते, दुर्सयांची झाडे तोडली जातात, मालमत्तेची चोरी होते, दारू पिऊन धिंगाणा घातला जातो. तसेच रंगपंचमीच्या निमित्ताने एकमेकांना घाणेरड्या पाण्याचे फुगे फेकून मारणे, घातक रंग अंगाला फासणे आदी गैरप्रकार होतात. या गैरप्रकारांमुळे धर्महानी होते. ही धर्महानी रोखणे हे आपले धर्मकर्तव्यच आहे. यासाठी समाजाचेही प्रबोधन करा. प्रबोधन करूनही गैरप्रकार घडतांना आढळल्यास पोलिसांत गार्हाणे करा. सनातन संस्था समविचारी संघटना आणि धर्मप्रेमी यांच्यासह यासंदर्भात अनेक वर्षांपासून जनजागृती चळवळ राबवत आहे. आपणही यात सहभागी होऊ शकता. वर्षभर होर्णाया वृक्षतोडीने जंगले उजाड होत असतांना, त्याकडे काणाडोळा करणारे तथाकथित पर्यावरणवादी आणि धर्मविरोधी संघटना वर्षातून एकदा येर्णाया होळीला 'कचऱ्याची होळी करा', अशा स्वरूपाच्या चळवळी राबवतात. ही धर्मविरोधी मंडळी परंपरा नष्ट करण्यासाठीच प्रयत्न करतात, हेच यातून दिसते. त्यामुळे हिंदूंच्या धार्मिक परंपरांत कोणी लुडबुड करू नये. हिंदूनो, धर्मविरोधकांच्या भूलथापांना बळी न पडता पर्यावरणपूरक, अपप्रकार विरहित; मात्र धर्मशास्त्र सुसंगत अशी होळी साजरी करा.

संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'

# रासायनिक रंग प्राणी पक्ष्यांसाठी धोकादायकच!

## रासायनिक रंग पोटात गेल्याने प्राण्यांच्या पचनक्रियेवर विपरीत परिणाम

होळीच्या (केश्वळ) दिवशी जबरदस्तीने रंग फासून रंगाचा बेरंग करू नका, असे आवाहन केले जात असले तरी जोर जबरदस्तीने मुक्या जीवाला रंग फसले जातात. मात्र रंगामुळे मुक्याजीवांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता वर्तवण्यात येत. रासायनिक अथवा विषारी रंग प्राण्यांच्या पोटात जाण्याची शक्यता असून, डोळ्यांवर विपरीत परिणाम होण्याचा धोका वाढतो.

रंगाने खेळताना नैसर्गिक अथवा गुलालाचे रंग उधळून रंगपंचमी साजरी करण्याचे आवाहन केलं जातं. मात्र या आवाहनाला हरताळ फासला जातो आहे. रासायनिक रंगांचे दुष्परिणाम सर्वांना ज्ञात असताना देखील अनेकजण होळीच्या (केश्वळ) दिवशी रासायनिक रंगाचा वापर करतात. काही वेळा मजेखातर प्राणी पक्ष्यांना रंग लावण्याचे प्रकार घडतात. परंतु रंगाचे दुष्परिणाम प्राणी पक्ष्यांना भोगावे लागत असल्याची माहिती ज्येष्ठ पशुवैद्यक डॉ. युवराज कागिनकर यांनी दिली.

प्राण्याच्या अंगावर पाणी टाकल्यावर हे पाणी पटकन जीभेने चाटून काढतात. ऑईलपेंटचा रंग कुत्रा, मांजर, ससा अशा केसाळ प्राण्यांच्या अंगावर सुकला तर त्यांचे केस निखळण्याची शक्यता अधिक असते. अंग चाटताना हे केस उपटून त्या ठिकाणी जखम होते. मुक्या प्राण्यांच्या अंगाला फसलेला रासायनिक रंग प्राण्यांच्या जीवावर उठू शकतो.

उष्मा वाढला असून रस्त्यावरचे प्राणी पक्षी मिळेल ते पाणी पितात. यामुळे रंगपंचमीच्या दिवशी काही ठिकाणी रस्त्यावर पाणी सांडते आणि हे पाणी कुत्रा, मांजर, कबुतर, चिमणी कावळा पक्षी हे पाणी पितात, मात्र रंगाचे पाणी प्यायल्याने पशुपक्ष्यांना अपायकारक ठरू शकते.

# कायदा कुठे? मुलीची छेड काढल्याचा जाब विचारणाऱ्या मुलीच्या कुटुंबावर जीवघेणा हल्ला

छत्रपती संभाजीनगर : मुलीची छेड काढून त्याचा जाब विचारण्यास गेलेल्या कुटुंबियांना लाकडी दांडयाने मारहाण झाल्याची घटना वाळूज भागातील जोगेश्वरी येथे समोर आली. टोळक्याने बुधवारी सकाळी १४ वर्षीय मुलीची छेड काढली. त्यानंतर मुलगी शाळेतून परत आल्यावर तिने कुटुंबियांना हा प्रकार सांगितला. त्याचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या मुलीच्या आई, वडील, मुलगी व तिच्या बहिणी यांना टोळक्याने लाकडी दांडा, लथा यांनी बेदम मारहाण केली. याप्रकरणी प्रतीक सतीश राजपूत, ऋषिकेश रामनाथ दुबिले, रोहित शंकरसिंग बहुरे, नीलेश रामनाथ दुबिले, यांच्यावर एमआयडीसी वाळूज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीना ताब्यात घेतले आहे.

सकाळी पाच वाजेच्या सुमारास मुलगी आपल्या घराचा ओटा झाडत असताना टोळक्याने तिची छेड काढली. त्यानंतर शाळेतून परत येत असताना टोळक्याने तिचा पाठलाग करून अश्लील हातवारे केले. यामुळे भयभीत झालेल्या मुलीने हा संपूर्ण प्रकार आपल्या घरी सांगितला. या सगळा संतापजनक प्रकार ऐकून कुटुंबीय टोळक्याला जाब विचारण्यासाठी गेले. त्यावेळी त्यांनी लाकडी दांडे, लाथा, बुक्यासह मारहाण केली. यात मुलीच्या आईला छातीवर लाथाने व डोक्यात काहीतरी मारून जखमी केले. वडिलांनाही ते तीघे मारत असताना तेथे काही जण भांडण सोडवण्यास आले, तेव्हा त्या तिघांनाही हाताचापटाने मारहाण करून शिवीगाळ केली. याप्रकरणी परस्पर विरोधी गुन्हे दाखल असल्याची माहिती आहे.

# वाढत्या तापमानात आरोग्याची घ्यावयाची काळजी

सर्वसाधारणपणे प्रामुख्याने प्रत्येक वर्षी माहे मार्च ते जून या महिन्यामध्ये उष्माघाताचा प्रादुर्भाव होत असतो. उष्माघातावर वेळीच उपचार, प्रतिबंधात्मक उपाययोजना न केल्यास गंभीर स्वरुपात आजारी पडणे किंवा मृत्यु होण्याची शक्यता असते. त्यासाठी जागरुकपणे प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविल्या पाहिजे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात प्रशासनाच्यास्तरावर रुग्णांना तातडीने औषधोपचार मिळण्यासाठी सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे व आरोग्य उपकेंद्र स्तरावर प्रथमोपचार व उष्माघात नियंत्रणाच्या अनुषंगाने शितकक्षाची स्थापना करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी दिली आहे. या विशेष कक्षामध्ये आवश्यक औषधी,साहित्य सामग्री सुसज्ज ठेवण्यात आली आहे.

उष्माघात होण्याची कारणे–

१. उन्हाळ्यामध्ये शेतावर अथवा इतर मजुरीची कामे फारवेळ करणे.

२. कारखान्याच्या बॉयलर रुममध्ये काम करणे, काच कारखान्यातील कामे करणे.

३. जास्त तापमानाच्या खोलीमध्ये काम करणे.

४. घट्ट कपड्यांचा वापर करणे.

अशा प्रत्यक्ष उष्णतेशी अथवा तापमानातील वाढत्या परिस्थितीशी सतत संबंध येण्याने उष्माघात होतो.

उष्माघाताची लक्षणे–

१. थकवा येणे, ताप येणे, त्वचा कोरडी पडणे.

२. भूक न–लागणे, चक्कर येणे, निरुत्साही होणे, डोके दुखणे.

३. रक्तदाब वाढणे, मानसिक अस्वस्थता, बेशुध्दावस्था इत्यादी.

प्रतिबंधक उपाय–

१. वाढत्या तापमानात फारवेळ कष्टाची कामे करणे टाळावे. (दुपारी १२ ते सायं.४ पर्यंत)

२. कष्टाची कामे सकाळी लवकर अथवा संध्याकाळी कमी तापमान असतांना करावीत.

३. उष्णता शोषून घेणारे कपडे (काळ्या किंबा भडक रंगाची कपडे) वापरु नयेत, सैल पांढ्या रंगाचे कपडे वापरावेत.

४. उन्हात बाहेर जाताना गॉगल्स, डोक्यावर टोपी, टॉवेल, फेटा वा उपरणे यांचा वापर करावा.

५. जलसंजीवनीचा वापर करावा, पाणी भरपुर प्यावे. सरबत प्यावे.

६. उन्हामध्ये काम करताना अधून–मधून सावलीत थोडीशी विश्रांती घ्यावी.

७. उष्माघाताची लक्षणे दिसू लागल्यास ताबडतोब काम थांबवावे.

प्रथमोपचार–

ह्व रुग्णास हवेशीर खोलीत किंवा पंखे, कुलर्स सुरु असलेल्या खोलीत किंवा वातानुकुलीत खोलीत ठेवावे.

ह्व रुग्णाचे तापमान खाली आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे.

ह्व रुग्णास थंड पाण्याने आंघोळ घालावी.

ह्व रुग्णाच्या कपाळावर थंड पाण्याच्या पट्या ठेवाव्यात, ऑईसपॅक लावावे.

ह्व वैद्यकीय सल्ल्यानुसार आवश्यकतेप्रमाणे शीरेवाटे सलाईन द्यावी.

ह्व उन्हामुळे त्रास जाणवल्यास आपल्या जवळच्या आरोग्य केंद्राशी तात्काळ संपर्क साधून औषधोपचार घ्यावा.

नागरिकांनी तापमानातील वाढ व यामुळे उद्भवणाऱ्या उष्माघात सारख्या आरोग्य विषयक गंभीर समस्या टाळण्यासाठी नागरिकांनी खबरदारी बाळगावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

माहिती स्रोतः– जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

**माहिती संकलनः– जिल्हा माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**

# चोरीच्या हेतूने अंधारात लपलेल्याला पोलिसांनी घेतले ताब्यात

छत्रपती संभाजीनगर : अंधारात चोरीच्या उद्देशाने लपून बसलेल्या संशयित तरुणाला पोलिसांनी गुपचूप येत पकडले. ही कारवाई टीव्ही सेंटर पोलीस कॉलनीजवळ शुक्रवारी (७ मार्च) रात्री साडेआठच्या सुमारास करण्यात आली. त्याच्याविरुद्ध सिडको पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अंमलदार अमोल घनशाम सुतार यांनी या प्रकरणात तक्रार दिली आहे. गुरुवारी (६ मार्च) डायल ११२ वर ते होमगार्ड राठोड यांच्यासह गस्तीवर होते. रात्री आठला त्यांना नियंत्रण कक्षातून कॉल आला की टीव्ही सेंटर पोलीस कॉलनीजवळ एक संशयित व्यक्ती चोरी करण्याच्या उद्देशाने फिरत आहे. त्यामुळे सुतार हे तातडीने घटनास्थळी पोहचले. त्या ठिकाणी संशयित व्यक्ती लपून बसलेला होता.

पोलिसांनी झडप घालून त्याला ताब्यात घेतले. त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने रवी पुंजाराम जाधव (वय २८, रा. शताब्दीनगर एन १२ हडको) असे सांगितले. पोलिसांनी त्याला पकडून सिडको पोलीस ठाण्यात आणले. त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार सुभाष शेवाळे करत आहेत.

# महाकुंभ म्हणजे समरसतेचा परिचय!

पान २ वरून

आणि ती गुलामी मानसिकतेच्या जोखडातून मुक्त होते, तेव्हा ती नव्या ऊर्जेने भारलेल्या ताज्या हवेत मोकळा श्वास घेते. याचाच परिणाम प्रयागराज येथे १३ जानेवारीपासून सुरु झालेल्या एकता का महाकुंभ म्हणजेच एकतेच्या महाकुंममध्ये पाहायला मिळाला. मोदी पुढे म्हणतात की, गेल्या वर्षी २२ जानेवारी २०२४ अयोध्यामध्ये रामंदिराच्या प्राणप्रतिष्ठे वेळी मी देवभक्ती आणि देशभक्ती बाबत विचार व्यक्त केले होते. देशात जागृत झालेल्या जाणिवेचे दर्शन अर्थात साक्षात्कार यावेळी घडला असे मोदी यांनी म्हटले आहे.

देशाच्या स्वातंत्र्यपूर्व काळात आपल्या भारत देशांत परकीय आक्रमणकारी शक्तीनी आपल्या येथील जनसामान्यांना हरप्रकारे नामोहरण, अन्याय, अत्याचार, आपल्या सांस्कृतिक मान्यता, परंपरा, देवीदेवता मंदिरांवर सतत हमले करून आमची श्रद्धास्थाने नष्ठ केली अशा प्रकारच्या वातावरणामध्ये आम्हाला कित्येक वर्षे संघर्षाला सतत तोंड द्यावे लागले आणि स्वातंत्र्यानंतर देखील आमच्याच कांही सत्तालोभी लोकांनी आपल्या पुरातन परंपरा, वास्तू, धार्मिक श्रद्धास्थाने यांची पुनर्स्थापना अथवा पुनर्निर्माण करण्याकडे जसे लक्ष द्यायला पाहिजे होते तसे ते त्या लोकांनी दिले नाही; परंतु नंतर असे दिसू लागले की, ही मंडळी आपल्या आराध्य श्रद्धास्थानाबाबत स्वतःच प्रश्न उपस्थित करतात आणि न्यायालयामध्ये प्रभू श्रीरामचे अस्तित्वावरच प्रश्न उपस्थित करतात आणि याचा सर्वसामान्य जनतेमध्ये प्रचंड रोष, चीड, संताप होता आपल्याला नंतर हे लक्षांत आले असेल की, जेव्हा आपले शेजारी बांगलादेशमध्ये तेथील अत्पसंख्याक हिंदू समुदाय आणि त्यांची श्रद्धा पूजास्थानांवर हमले झाले तेव्हा भारतातील हिंदू समुदायामध्ये प्रचंड रोष व तीव्र नाराजी व्यक्त झालेली होती. यानंतर जनसामान्यांमध्ये आपल्या स्वः ची भावना वेगाने जागृत होत असल्याचे अनुभवयाला येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेशन फर्स्ट अर्थात राष्ट्र प्रथम ही भावना दिवसेंदिवस अधिकाधिक बलवत्तर होऊ लागली असल्याचे जाणवत आहे. महाकुंभाचे आयोजनाचे पूर्वी गेल्या वर्षी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी उत्तर प्रदेश येथील मथुरा येथे संघाच्या एका महत्त्वपूर्ण बैठकीच्या वेळी संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, सरकार्यवाह दत्तात्रेय होसबोले यांचेसह कांही प्रमुख ज्येष्ठ पदाधिका□यांसोबत महाकुंभाच्या विषयाच्या संदर्भात बोलणी केली आणि महाकुंभाचे आयोजनामध्ये संघाकडून सहयोग आणि सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली होती आणि त्यावेळी संघाने मुख्यमंत्र्यांना आपले पूर्व सहकार्याचे आश्वासन दिले होते.

आरएसएसच्या आणखी एका आनुशांषिक संघटन अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रमच्या मार्गदर्शनामध्ये कार्यरत जनजाती सुरक्षा मंचने ६ ते १० फेब्रुवारी २०२५ पर्यंत प्रयागराज येथे जनजाती सांस्कृतिक समागमचे आयोजन करण्यात आले होते आणि यामधे सुमारे दहा हजार विभिन्न जनजाती समुदायाचे वनवासी लोग सहभागी झाले होले. यातील अनेक जण प्रथमच त्रिवेणी संगमावर आले होते आणि त्या सर्वांना महाकुंभमधे डुबकी मारण्याचे भाग्य लाभले.देशांतील विद्वान महामंडलेश्वर स्वामी अवधेशानंद गिरी महाराज समेत अनेक अन्य धर्माचार्य, संत, महंताचे विचार व मार्गदर्शन आशीर्वाद लाभले आहे. महाकुंभामुळे जवळच असलेल्या अयोध्या व काशी विश्वनाथ मंदिराचे दर्शनासाठी भाविकांची गर्दी लोटने स्वाभाविकच होते आणि याची कल्पना उत्तर प्रदेश सरकारला होतीच त्यामुळे राज्य सरकारने ही तशी पुरेशी काळजी, खबरदारी घेतलेली होती. या सर्वाचा परिणाम निश्चितपणे राज्यांतील अर्थव्यवस्थेवर सकारात्मक पडणार आणि पर्यायाने येथील जनसामान्यांचे जीवनमान स्तर उंचावेल असे संकेत प्रसिद्ध अर्थशास्त्री व्यक्त करीत आहे. महाकुंभमुळे मार्च २०२५ च्या शेवटापर्यंत चार दिलियन डॉलरवर भारताची अर्थव्यवस्था पोहोचू शकेल असा विश्वास देशांतील प्रमुख अर्थवेत्त्यांनी व्यक्त केला आहे. दुसरीकडे अयोध्येत राम मंदिराच्या पुनर्निर्माणसाठी गेल्या कित्येक वर्षापासून झालेला लम्बा मोठा संघर्ष आणि त्यासाठी अनेकांचे झालेले बलिदान व नंतर देशांत हिन्दुत्व व सांस्कृतिक राष्ट्रवाद जागरण विशेषतः राम मंदिर प्राणप्रतिष्ठा समारोहानंतर आणि अगदी अलीकडे गेल्या महिन्यांत संपन्न झालेल्या महाकुंभामुळे हिंदू समाज आपल्या सिद्धांत, परंपरा, आस्था, श्रद्धा, म्हणजे मूळः बैक टू बेसिकः कडे परत येत आहे असे कोणी म्हटले तर ते अतिशयोक्ती होणार नाही.

# हज-उमराहसाठी घेऊन जाणारा ट्रव्हल्स एजंट पैसे घेऊन पसार - पिडीत विरूध्द गुन्हा दाखल

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथील न्यायमुर्ती पेडनेकर यांनी अटकपुर्व जामीन मंजुर करून हज-उमराह साठी घेऊन जाणाच्या नावाखाली लोकांचे पैशे घेऊन पसार झालेल्या व्यक्ती व्यतीरिक्त सदरील व्यक्तीशी ओळख करून देणाऱ्या एक पिढीता विरूध्द शिऊर पोलीस ठाणे ता. वैजापुर येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यास मुंबई उच्च न्यायालया खंडपीठ औरंगाबादने जामीन मंजूर केला आहे.

**उच्च न्यायालयाने अटकपुर्व जामीन केली मंजुर**

कमरोद्दीन नावाच्या एका इसामाची ओळख सदरील तक्रारीतील आरोपी बरोबर झाली असता यांनी आरोपीला सांगितले की मी फक्त ४५०००/- रूपयात उमराह करण्यासाठी मक्का व मदीनाला घेऊन जाईल व तुम्हाला तेथे हाजी लोकांची सेवा करावी लागेल तसेच तु तुझे नातेवाईक व मित्रांना या बाबत माहिती दे यातील जर आणखी काही लोक जमले तर आपण लवकर निघु. ज्या करिता यातील आरोपीने आपले नातेवाईक व मित्रांना सांगितले जे कोणी तयार झाले त्यांची भेट कमरोद्दीनशी सदरील आरोपीने करून दिली व लोकांनी सहमती दाखवून उमराहसाठी पैसे थेट कमरोददीनला तर काही लोकांनी सदरील आरोपीस रोख व ऑनलाईनव्दारे दिले जे पैशे आरोपीने कमरोददीनला ऑनलाईन पाठविले. कमरोददीनने रक्कम मिळाल्यानंतर उमराहला घेऊन जाण्यासाठी तारीख पे तारीख दिली व नंतर पैशे घेऊन पसार झाला. सदरील बाब आरोपीच्या लक्षात आली तेव्हा त्यांनी बेगमपुरा पोलीस स्टेशन येथे कमरोददीन व त्यांची पत्नी महेजबीन विरूध्द तक्रार दाखल केली तदनंतर यातील काही इतर पिडीतांनी कमरोददीन व त्यांची पत्नी विरूध्द तक्रार न करता ओळख करून देणारे व स्वत: पिडीत असलेल्या व्यक्ती विरूध्द शिऊर पोलीस ठाणेला तक्रार दाखल केले. सदरील प्रकरणात आरोपीने अटक पुर्व जामीन मिळवण्यासाठी ॲड. जकी नवाब पटेल व सि.आर. देशपांडेमार्फत मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे जामीन अर्ज दाखल केला प्रस्तुत प्रकरणात कागदोपत्री पुरावे लक्षात घेऊन न्यायमुर्ती पेडनेकर यांनी आरोपीस अटकपुर्व जामीन मंजुर केला. आरोपी तर्फे ॲड. जकी नवाब पटेल यांनी काम पाहिले तर शासना तर्फे एन.बी. पाटील यांनी काम पाहिले.

# अतिरिक्त आयुक्त खुशालसिंग परदेशी यांचा शिवराणा सेवा संघ वतीने सत्कार



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

हिंगोलीचे उपजिल्हाधिकारी यांना बढती अतिरिक्त आयुक्त म्हणून विभागीय आयुक्त कार्यालयात पदभार श्री खुशाल परदेशी ( गोलवाल) रूजू छत्रपती संभाजीनगर येथे रूजू होतांच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. यांत सामाजिक संघटना शिवराणा सेवा संघ वतीने अतिरिक्त आयुक्त मा खुशालसिंग परदेशी यांनी वेळोवेळी मार्गदर्शन महापुरुषांच्या जयंत्या उत्सव साजरे करून त्यांच्या विचारांना चालना देण्यासाठी सदैव तत्पर राहतात. अधिकारी छत्रपती संभाजीनगर येथे आलेत यांचा आनंद होतो, असे एलडी ताटू यांनी सांगितले. समाज मेळाव्यात यांचा सक्रिय सहभाग असतो. त्यामुळे चालना मिळाली आहे सदैव तत्पर सेवा मिळेल. आम्ही कामे घेऊन जाणार अशी अपेक्षा व्यक्त केली. या वेळी एल.डी. ताटू, ॲड. सुभाष कोकुल्डे, आनंद बारवाल, नारायण उटाडे आदी सत्कारप्रसंगी उपस्थित होते.

### महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणातर्फे दि.२२ रोजी लोकअदालत

छत्रपती संभाजीनगर- महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई, खंडपीठ औरंगाबाद (मॅट) येथे शनिवार, दि.२२ रोजी लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. लोक अदालतमध्ये न्यायाधिकरणात प्रलंबित असलेली महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांची तडजोड पात्र सेवा विषयक प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली आहेत. लोक अदालतमध्ये प्रकरणे तडजोडीने निकाली काढल्यास शासकीय कर्मचारी व शासन यांच्या वेळेचा अपव्यय होणार नाही, तसेच पक्षकारांना न्याय मिळेल. तरी शनिवार दि.२२ रोजी होणाऱ्या लोक अदालतमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी सर्व पक्षकारांनी, त्यांच्या वकीलांनी व संबंधितांनी सहकार्य करावे. लोक अदालतचा जास्तीत जास्त पक्षकारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई, औरंगाबाद खंडपीठ (मॅट) प्रभारी प्रबंधक संदीप मुंडे यांनी केले आहे.

# माजी विद्यार्थी इंजि.श्री.एम.व्ही. पाटणीतर्फे सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्याला सुवर्णपदक व रोख पारितोषिक प्रदान



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद, छत्रपती संभाजीनगर येथे वार्षिक स्नेहसंमेलन 'अंतरंग २०२५ 'मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. या महाविद्यालयाच्या पहिल्या बॅचचे (१९६४) स्थापत्य अभियंता इंजि.श्री. एम. व्ही. पाटणी यांच्या वतीने सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्याला सुवर्णपदक, रोख ५१,००० व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

इंजि.श्री एम. व्ही. पाटणी यांनी हे बक्षीस सलग दहा वर्षे देण्याची घोषणा १२ मार्च २०२२ रोजी महाविद्यालयातील माजी विद्यार्थी संघटनेच्या मेळाव्यात केली होती. या उपक्रमाचा चौथा वर्षक्रम साजरा होत असताना, २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार कुमारी राही नितीन गायकवाड हिला प्रदान करण्यात आला.

ती इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन शाखेची विद्यार्थीनी असून, तिच्या उल्लेखनीय शैक्षणिक यशासाठी तिला हा मानाचा पुरस्कार मिळाला. यापूर्वी हे बक्षीस कुमारी पल्लवी वेदपाठक, कुमारी महेश्वरी बिराजदार आणि प्रीतम निकुंभ या विद्यार्थ्यांना देण्यात आले आहे. यावेळी पुरस्काराचे प्रणेते इंजी. श्री एम. व्ही. पाटणी यांनी या योजनेमागील भावना व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, 'ज्या अभियांत्रिकी महाविद्यालयाने आपल्या आयुष्याला आकार दिला, त्या संस्थेचे ऋण फेडण्याच्या उद्देशाने आपण सुवर्णपदक व रोख ५१,००० देण्याची योजना आखली आहे.'

हा सन्मान समारंभ दिनांक ८ मार्च २०२५ रोजी 'अंतरंग २०२५' या कार्यक्रमात संपन्न झाला. या कार्यक्रमाला सी.आय.आय. चे उपाध्यक्ष आणि एन्ड्रेस व हाऊझर कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक इंजी. श्री. नरेंद्र कुलकर्णी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय डंभारे,इंजि.श्री एम. व्ही. पाटणी यांच्या शुभहस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले.

याप्रसंगी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष डॉ. उत्तम काळवणे, संतोष आटियामुलु, डॉ. चित्रा गायकवाड, डॉ. शैलेश आंबेकर, इंजि भास्कर चाटे, महाविद्यालयातील शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारतीय सैन्य भरती : ऑनलाइन अर्ज मागविले

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

भारतीय सैन्यभरतीसाठी ऑनलाइन सामान्य प्रवेश परीक्षा **(CEE)** वर्ष २०२५-२६करीत अधिसूचना जाहीर करण्यात आली आहे. इच्छुक उमेदवारांनी **www.joinindianarmy.nic.in** या अधिकृत संकेतस्थळावर दि. १२ मार्च ते १० एप्रिल दरम्यान आपले अर्ज दाखल करावे. ही भरती प्रक्रिया दोन टप्प्यांत होणार आहे.

पहिला टप्पा- संगणक आधारित लेखी परीक्षा **(CEE)** निश्चित उइढ केंद्रांवर घेतली जाईल. अग्निवीर लिपिक/ **SKT** पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना टायपिंग चाचणी द्यावी लागेल. दुसरा टप्पा- उएए उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांसाठी शारीरिक तंदुरुस्ती चाचणी आणि शारीरिक मापन चाचणी भरती मेळाव्यादरम्यान घेतली जाईल.

तिसरा टप्पा- भरती मेळावा सैन्य भरती कार्यालयाच्या माध्यमातून संबंधित ठिकाणी आयोजित केला जाईल. त्याआधी उमेदवारांची अनुकूलता चाचणी **(Adatability Test)** आणि वैद्यकीय चाचणी होईल. उमेदवारांनी चाचणीसाठी योग्य बॅटरी बॅकअप आणि **2G$B** डेटा असलेला स्मार्टफोन बरोबर आणावा.

अग्निवीर उमेदवारांना त्यांच्या पात्रतेनुसार कोणत्याही दोन गटांसाठी अर्ज करता येईल. मात्र, त्यांना प्रत्येक गटासाठी स्वतंत्र अर्ज भरावा लागेल आणि स्वतंत्र प्रवेश परीक्षेला सामोरे जावे लागेल. तथापि, भरती मेळावा व वैद्यकीय चाचणी फक्त एकदाच दिली जाईल. खेळाडूंना, **NCC** प्रमाणपत्रधारकांना, **ITI** आणि डिप्लोमा धारकांना विशेष गुण देण्यात येणार आहेत. नोंदणी, परीक्षेची प्रक्रिया आणि सराव चाचणी याबाबत माहिती देणारे व्हिडिओ भारतीय सैन्याच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सर्व इच्छुक उमेदवारांनी अधिक माहितीसाठी **www.joinindianarmy.nic.in** संकेतस्थळाला भेट द्यावी. उमेदवारांनी कोणत्याही दलाल किंवा फसवणूक करणाऱ्या व्यक्तींच्या भूलथापांना बळी पडू नये,असे भरती संचालक अनुज सिंघल यांनी कळविले आहे.

# 'जितो लेडीज विंग' च्या विविध कार्यकमांना उत्स्फुर्त प्रतिसाद

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**



नेहमी सामाजिक व जनकल्याणकारी उपक्रम राबविणा-या जितो लेडीज विंग तर्फे विविध सामाजिक उपव्रफ्म राबविण्यात आले याच अंतर्गत नुकतेच ग्लिस्टनिंग गोल्ड ज्वेलरी ची कार्यशाळा आयोजीत करण्यात आली होती. या कार्यशाळेमध्ये दर्शना सेठीया यांनी सोन्या चांदीचे दागीने कसे ओळखावे व सोन्याचे विविध रंग यावर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेमध्ये ९८ महिलांचा सहभाग होता. तसेच स्टार्टअप पिच डे हा कार्यकम आयोजीत करण्यात आला. या प्रेरणादायी महिला उदयोजकांनी नविन स्टार्टअप व व्यवसायाबददल कल्पना दिली. यावेळी सागर गोसलिया व स्नेहा रायसोनी यांनी प्रेरणादायी महिला उदयोजकांच्या प्रवसातुन शिकण्याची संधी गुंतवणुकदार उदयोजक व इनोव्हेसोबत नेटर्वकिंग तसेच विविध साक्षरता कार्यशाळा घेण्यात आली. यामध्ये सी.ए.रूपाली बोथरा यांनी सांगीतले की पैसे कुठे व कसे गुंतवायचे तसेच गुंतवणुकीसाठी उपयुक्त कल्पना व माहिती व मनिमार्केटचे महत्व यावर मार्गदर्शन केले.

तसेच कृती बुध्दीमत्ता व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये सुदर्शन कटारिया यांनी चॅट जि पी टी व ए आय टुल्स यावर माहिती दिली. यामध्ये ६५ महिलांनी कार्यशाळेत सहभाग घेतला होता व नविन तंत्रज्ञान शिकण्याचा आनंद घेतला. संपुर्ण कार्यकम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष प्रिया मुथा उपाध्यक्ष रितु जैन, प्रिती बाकलीवाल, सचिव सोनल जैन, सहसचिव सपना मुथियान, सारिका सेठी, कोषाध्यक्ष प्रियंका संघवी यांनी परिश्रम घेतले.

# होलिकापूजन असे करा!

फाल्गून शुक्ल अष्टमीपासून पौर्णिमेपर्यंत आठ दिवस होलाष्टक साजरे केले जाते. त्यासोबतच होळी उत्सव साजरा करण्याची सुरूवात होते. होळीची तयारी देखील तेव्हापासूनच सुरू होते. होळी दहन आणि पूजा यासाठी खालील बाबींकडे लक्ष द्या.

होळीला कोणत्याही झाडाची लाकडे (फांद्या) कापून त्यावर रंगबिरंगी कपड्याचे तुकडे बांधले जातात. प्रत्येक जम झाडाच्या त्या फांदीला कापडाचा एक तुकडा बांधतो. ती फांदी कपड्यांच्या तुकड्यांनी पूर्णपणे झाकली जाते, तेव्हा तिला सार्वजनिक ठिकाणी गाडले जाते. नंतर त्या फांदीच्या चहुबाजूने लोक उभे रहातात. गवत, वाळलेली लाकडे, गर्वया होळीत रचल्या जातात. त्यालाच होळी म्हणतात. त्यानंतर मुहूर्तानुसार होलिका पूजन केले जाते. वेगवेगळ्या क्षेत्रात आणि समाजात वेगवेगळ्या पध्दतीने पूजा केली जाते. आपल्या पारंपारीक पूजा पध्दतीच्या आधारे पूजा करायला हवी. होळी पूजनावेळी खालील मंत्राचे उच्चारण करायला हवे...

**अहकूटा भयत्रस्तैः कृता त्वं होलि बालिशैः ।**
**अतस्वां पूजयिष्यामि भूति-भूति प्रदायिनीमब ।।**

पूजनानंतर होळी दहन केले जाते. दहनानंतर गव्हाच्या ओंब्या त्यात भाजल्या जातात. हा सण नवीन पिकाच्या आनंदातही साजरा केला जातो. होळी दहनानंतर जी राख उरते. तिला भस्म म्हटले जाते. ते शरीरावर लावायला हवे. राख लावताना खालील मंत्राचे उच्चारण करावे...

**वंदितासि सुरेन्द्रेण ब्रम्हणा शंकरेण च ।**
**अतस्त्वं पाहि माँ देवी! भूति भूतिप्रदा भव ।।**

होळीची गरम राख घरात समृध्दी आणते असे मानले जाते. असे केल्याने घरात शांती आणि प्रेमाचे वातावरण निर्माण होते.

# औरंगजेब समाधी परिसरात कडेकोट बंदोबस्त पोलीस प्रशासन हायअलर्टवर



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद शहरात हजरत सय्यद जैनोद्दीन शिराजी दर्गा व औरंगजेब समाधी परिसराच्या सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासन सतर्क झाले आहे. विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा यांनी बुधवारी सायंकाळी पाचच्या सुमारास खुलताबाद येथे भेट देऊन सुरक्षेचा आढावा घेतला.या पाहणीदरम्यान त्यांनी धार्मिक तणाव टाळण्यासाठी व अनुचित प्रकारास आळा घालण्यासाठी आवश्यक ती दक्षता घेण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या.

पोलीस सुरक्षाच्या अनुषंगाने पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा हे दर्गा परिसराच्या पाहणी करताना या दरम्यान, स्थानिक पत्रकार छायाचित्र घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या पत्रकारांना पोलिसांनी रोखल्याने. सोशल मीडियातून आक्षेपार्ह पोस्टस्मुळे धार्मिक,जातीय तेढ निर्माण होण्याचे प्रकार खुलताबाद येथे वाढत आहेत. या अनुषंगाने पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा व पोलीस अधीक्षक विनय कुमार राठोड.यांनी खुलताबाद शहरात भेट दिली.

पोलीस अधीक्षक विनय कुमार राठोड यांनी ही औरंगजेब समाधी परिसराची पाहणी केली सुरक्षाच्या दृष्टिकोन कोणत्याही अनुचित प्रकार घडू नाही म्हणून खबरदारी घेतल्या जात आहे.. औरंगाबाद परिक्षेत्रातील सध्या घडणाऱ्या जातीय व धार्मिक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर प्रशासन अधिक सतर्क आहे. पोलीस अधीक्षक विनय कुमार राठोड यांनी ही समाधी परिसराची पाहणी केली असून, कोणत्याही अनुचित प्रकारास प्रतिबंध करण्यासाठी चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. राज्यात आगामी

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**